**2. MR.RISHU KUMAR SHARMA**
**3.MR. BABLU KUMAR SINGH**
**4.MR.MAHAVIR MAGANLAL JAIN**

..... RESPONDENTS

**NOTICE UNDER ORDER XXI, RULE 22 OF THE CODE OF CIVIL PROCEDURE, 1908**

To,
1. Mr. Rishu Kumar Sharma
Res Add- Res. Add -Unit No Ins-Tarkash Qtr Ap /2, Bldg 6450 Navy Nagar, Colaba, Mumbai - 400 005
Office Add.- Naval Unit Instarkash P N 2196, Sailpr Navy Nagar, Colaba, Mumbai - 400 005.
(The Respondent/Opponent No. 2 abovenamed)
2.Mr. Bablu Kumar Singh
Res.Add- -Sai Sadguru Plot 146/37, Room No 402 Sec 34, Kamothe Panvel Navi Mumbai -410209
Res. Add -Om Sai Complex Phase-2, Flat No-303, Building No-02, Ram Nagar, Shrigaon, Badlapur (E) Thane – 421503
Office Add- B K Marine Enterprises Room No-02, Hargune Yada.
(The Respondent/Opponent No. 3 abovenamed)

TAKE NOTICE THAT you arehereby required Under Order XXI,Rule 22 of the Code of Civil Procedure, 1908 to appear either in person or by an Advocate before the Registrar Court situated at 2nd Floor, Old Secretariat Building, Mumbai– 400 032 on the 12th day of November 2025 at 12.30p.m sharp in the forenoon, to Show-cause why the Award passed by the Arbitrator & Jt. Registrar of Chits, Mumbai, Thane & Raigad against you on the 29th day of September 2022 in the above matter, should not be executed against you.

Dated this 17th day of October 2025
SEALER
Dated this 25th day of September 2025
SEAL
For Registrar
City Civil Court, Mumbai
**Advocate for the Disputant/Claimant**

## CANARA BANK VAKOLA(0119) BRANCH

केनरा बैंक Canara Bank — सिंडिकेट Syndicate

Address of Branch - Sunrise Apartments, Plot No. 369, Nehru Road, Vakola, Jayashree Vakola Bridge, Santacruz (East), Mumbai 400055

**DEMAND NOTICE FOR LOCKER RENT ARREARS & LOCKER BREAK OPEN NOTICE**

This is to inform you that in respect of safe deposit locker hire agreement executed by you with us, we had sent you registered letters requesting you to surrender the locker in case you do not wish to renew the contract, which came to us undelivered and / or that you are yet to comply with our request to renew the hire contract or surrender the locker by clearing off rent arrears.

We therefore request you to renew the hire contract or surrender the locker by clearing off the rent and penalty arrears within seven days from this notice. Please note that on your failure to do so we shall be constrained to break open the locker at 11.30 a.m. on the date 20/11/2025 at the Vakola branch & if it is not possible to break open the locker on that day or any convenient date thereafter without a fresh notice to you. Please note that Bank has lien over the contents of the locker towards the amount due to the bank for costs, rent and other incidental expenses relating to the locker. In exercise of the said lien, the articles will be sold in public auction or private sale through brokers, auctioneer or otherwise at 1:00 p.m. on the date 19/12/2025. If it is not possible to hold the sale on that day, any convenient day thereafter without fresh notice to you.

The sale proceeds will be appropriated towards the amount due to the Bank for costs, rents and other incidental expenses and if there is any surplus, the same will be credited to suspense account in your name on which no interest will be paid. If however the sale result in deficit you will be held responsible to pay such shortage.

List of the hirers having locker arrears and penalty arrears.

| Sr No | Locker Account No | Locker No | Name of the Locker Hirers | Address | Branch Name /Contact no. | Arrears Due And Last Operation |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 123005786032 | 107 | Jayashree Vithal Gok | 7/27 Kumar Chs Vakola Santacruz East 400055 | Vakola/ 9677430012 | 2,360.00 Arrears due more than 3 years/ locker not operated more than 7 years. |
| 2 | 123005805155 | 709 | Sushila Khairajani | New Model English High School Vakola Masjid Santacruz (e) Mumbai-400055 | Vakola/ 9677430012 | 2,360.00 Arrears due more than 3 years/ locker not operated more than 7 years. |
| 3 | 123005785732 | 1284 | Eliza D`souza | Parsuram Chougle Chawl R.no.475 Vivekanand Ngr Vakola Bridge Santacruz East 400055 | Vakola/ 9677430012 | 4,720.00 Arrears due more than 3 years/ locker not operated more than 7 years. |
| 4 | 123005800403 | 165 | Sheila Alexander | Florence 401,4th Floor, Nehru Rd,Vakola, Santacruz(E) 400055 | Vakola/ 9677430012 | 4,720.00 Arrears due more than 3 years/ locker not operated more than 7 years. |
| 5 | 123005874613 | 1178 | Allwyn Dsilva | P A A C Std Po Box 28311 Safat 13083 Kuwait 400055 | Vakola/ 9677430012 | 6,637.04 Arrears due more than 3 years/ locker not operated more than 7 years. |
| 6 | 123005848532 | 252 | Satyendar S Negi | Santoshi Mata Chawl, datta Mandir Road, Vakola Bridge Santacruz East, 400055 | Vakola/ 9677430012 | 9,440.00Arrears due more than 3 years/ locker not operated more than 7 years. |

**Place : Mumbai**
**Date : 11/11/2025**
**MANAGER**
**CANARA BANK**

# कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील तीन माजी नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्य उपस्थितीत पक्ष प्रवेश**

**डोंबिवली : प्रमोद कुमार**

शिवसेना मुख्यनेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्य उपस्थितीत कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रातील भाजपाचे माजी नगरसेवक विकास गजानन म्हात्रे, भाजपच्या माजी नगरसेविका कविता विकास म्हात्रे आणि माजी नगरसेवक नंदू धुळे - मालवणकर यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांनीही यावेळी उपस्थित राहून सर्वांचे पक्षात स्वागत केले. राज्यात शिवसेनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या जनहितकारी, विकासाभिमुख आणि लोकाभिमुख कामकाजामुळे जनतेत प्रचंड उत्साह निर्माण झाला असून, या कार्यपद्धतीने प्रभावित होऊन विविध पक्षांतील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते



मोठ्या संख्येने शिवसेनेशी जोडले जात आहेत. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, "विकासाला दिलेली चालना आणि जनतेच्या प्रश्नांवर थेट काम करण्याच्या दृष्टिकोनामुळे आज सर्वच स्तरातून शिवसेनेला भक्कम पाठिंबा मिळत आहे. आगामी सर्व निवडणुकांमध्ये शिवसेना पक्ष म्हणून प्रत्येक शिवसैनिकाच्या मागे ठामपणे उभी राहील," असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी भिवंडी उबाठा संपर्क प्रमुख साईनाथ तरे, डोंबिवली भोपरगाव उबाठा विभागप्रमुख दिलखुश माळी, युवासेना समन्वयक पंकज माळी, शाखा प्रमुख सागर पाटील, विजय साळवी, संदीप रपसे, तसेच गांधीनगर विभागातील भाजपच्या अक्षता भोसले, भाविक म्हात्रे, राजेंद्र खरात, अंकुश पिंजळकर, अमोल पाटील, प्रकाश मोरे, विजय धुरे, प्रीती आचरेकर, उर्मिला नाईक, रवींद्र लोट, मधू करंजे, स्वप्नील सोलिम आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. सर्वांचे पक्षात स्वागत करून त्यांना पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी खासदार नरेश म्हस्के, आमदार राजेश मोरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, महेश गायकवाड यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिनेश इंजिनियर्स लिमिटेडच्या ग्रुप सीईओ पदी बृजेश सिंग यांची नियुक्ती

**मुंबई : सचिन मुरडेश्वर**



दिनेश इंजिनियर्स लिमिटेड (DEPL), या अग्रगण्य टेलिकॉम आयपी-१ आणि टर्नकी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंपनीने, बृजेश सिंग यांची नवीन ग्रुप मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) म्हणून नियुक्ती केली आहे. विविध क्षेत्रांमध्ये जवळजवळ ३० वर्षांचा अनुभव असलेले बृजेश सिंग हे एक अनुभवी आणि बहुआयामी व्यावसायिक नेते आहेत. ते डीईपीएल (DEPL) समूहात नवोन्मेष, कार्यक्षमता आणि शाश्वत वाढ यांना चालना देणार आहेत. दिनेश इंजिनियर्स लिमिटेड (DEPL) ही भारतातील निष्क्रिय टेलिकॉम पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातील एक अग्रगण्य आणि प्रतिष्ठित कंपनी आहे. कंपनी देशातील २० हून अधिक राज्यांमध्ये ऑप्टिकल फायबर नेटवर्क रोल-आऊट, ऑपरेशन आणि देखभाल आणि डार्क फायबर तरतूद यासह एंड-टू-एंड सोल्यूशन्स ऑफर करते. विशेषतः दक्षिण आणि पश्चिम भारतात त्यांची मजबूत उपस्थिती आहे. तसेच, कंपनीकडे ४ ठिकाणी सिटी गॅस डिस्ट्रीब्युशन (CGD) परवाने आहेत.

DEPL मध्ये सामील होण्यापूर्वी, श्री. सिंग हे आर्थर डी. लिटल इंडिया येथे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते, जिथे त्यांनी विविध क्षेत्रांतील परिवर्तन प्रकल्पांचे नेतृत्व केले.

# संविधान अमृत महोत्सव वर्षानिमित्त समता परिषद आयोजित विशेष बैठकीचे आयोजन

**मुंबई सुरेश वाघमारे**




दिनांक ९/११/२०२५ रोजी सखी कार्यालय डहाणुकरवाडी कांदिवली येथे समता परिषद मुंबई यांच्या वतीने संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प संस्थेचे अध्यक्ष मा विजय भाई गिरकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली त्या वेळी विजय भाउ पवार निमंत्रक मधुकर गवई अध्यक्ष चारकोप विधानसभा रिपाइं, संजय बाविस्कर समता परिषद चारकोप विधानसभा मधील आव्हाणी बुद्ध विहार समिती चे कुलदिप म्हस्के, विशाल म्हस्के, पंचशील बुद्ध विहार समिती, भैय्यासाहेब मोरे, संपत घुगे, महामाया बुद्ध विहार समिती चारकोप गांव भानुदास मोरे, प्रकाश प्रधान, विश्व दिप बुद्ध विहार समिती चे काशीनाथ अदमाने, ज्ञानेश्वर टकले सतिश सदावर्ते, जयकेश सदावर्ते, लुम्बीनी बुद्ध विहार समिती चे अध्यक्ष यशवंत रोहीमल , आदर्श बुद्ध विहार समिती सुहास मगरे व अमित गवळी , व डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रशिक बहुउद्देशीय सांस्कृतिक केंद्र रजि यांचे अध्यक्ष मधुकर गवई, रावसाहेब दाहीजे खजिनदार, शुद्धोन साळवे, विनोद जाधव, विजय गायकवाड, अनिल मोरे,, प्रविण राउत खजिनदार, गजानन गवई, विजय भाऊ पवार, आकाश गवळी, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते

# कल्याण-डोंबिवली महापालिकेचा पुढील महापौर युतीचाच- भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केला विश्वास व्यक्त

**डोंबिवली : प्रमोद कुमार**



कल्याण डोंबिवली मध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने राजकीय पक्ष ही सक्रिय झाले आहेत काही स्वार्थी राजकारणी आपल्या पदरात पद मिळण्यासाठी कोलांडी उड्या सुरू झाले आहेत त्याचा प्रत्यय कल्याण डोंबिवली मध्ये येताना दिसत आहे मतदार राजा कोणाच्या पदरात मतदान करते हे त्यांच्या विचारावर अवलंबून असेल. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत युतीचा महापौर देईल असा ठाम विश्वास भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी व्यक्त केला. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष दीपेश म्हात्रे यांनी ९ नोव्हेंबर २०२५ रोजी आपल्या समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला.डोंबिवली पूर्व जिमखाना मैदानात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण,माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील,ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, आमदार सुलभा गायकवाड,कुमार आयलानी,माजी आमदार नरेंद्र पवार, जिल्हाध्यक्ष नंदू परब,कल्याण निवडणूक प्रमुख नरेंद्र सूर्यवंशी यांच्यासह भाजपचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी रवींद्र चव्हाण म्हणाले की, ₹ केंद्रात नरेंद्र मोदीजी यांचे नेतृत्व असलेले सरकार आणि राज्यात महायुतीचे सरकार असून, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास केवळ पारदर्शक शासन पद्धतीनेच शक्य आहे, आणि ती क्षमता फक्त भाजपकडे आहे.₹ त्यांनी पुढे सांगितले की,₹ दीपेश म्हात्रे यांच्यासारखे ऊर्जावान व तरुण नेतृत्व पक्षात आले असून, कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेत आणखी काही नगरसेवक लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत.₹ प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी स्पष्ट केले की,₹ या महापालिकेला एक पारदर्शक आणि विकासाभिमुख महापौर देण्याचा निर्धार भाजपने केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस व उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आगामी निवडणुकीत भाजपच महापौरपद मिळवेल,असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे.₹ यावेळी काँग्रेस माजी नगरसेवक संतोष केने यांच्या समर्थकासह कल्याण - डोंबिवली आणि उल्हासनगर विभागातील विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी भाजप मध्ये प्रवेश केला ।

# धक्का लागल्याने सटकली; रागाच्या भरात हॉटेलबाहेर धारदार शस्त्राने तरुणाची हत्या

**डोंबिवली : प्रमोद कुमार**

डोंबिवलीतील मालवण किनारा हॉटेलसमोर तरुणाची धारदार शस्त्राने हत्या केली आहे. या प्रकरणी मानपाडा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हत्या धक्का लागल्याने क्षुल्लक कारणाने झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. डोंबिवलीतील पूर्वेतील स्थिर मालवण किनारा हॉटेलसमोर शनिवारी रात्री उशिरा एक धक्कादायक घटना घडली आहे. हॉटेलमधून बाहेर पडताना किरकोळ धक्का लागला. त्यानंतर दोन तरुणांमध्ये झालेल्या वादातून एका तरुणाची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली आहे. या घटनेने डोंबिवली परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मृत तरुणाचे नाव आकाश सिंग असे आहे. तो नवी मुंबई येथे कॉल सेंटरमध्ये काम करत होता. हॉटेलमधून बाहेर पडताना त्याचा एका दुसऱ्या तरुणासोबत किरकोळ धक्का लागला. या क्षुल्लक कारणावरून वाद वाढला आणि त्या तरुणाने आपल्या साथीदारासह आकाशवर हल्ला चढवला. डोंबिवलीतील एका हॉटेलमधून बाहेर पडताना झालेल्या किरकोळ धक्क्यावरून झालेल्या वादात ही हत्या झाली. हल्ल्यात धारदार शस्त्राचा वापर करण्यात आला आहे. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या आकाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या प्रकरणी मानपाडा पोलिसांनी हत्या गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी आरोपींची ओळख पटविण्याचे आणि त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या घटनेने डोंबिवली परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या मुंबई प्रादेशिक विभागाचे, आठवे द्वैवार्षिक अधिवेशन संपन्न

**नवी मुंबई : सचिन मुरडेश्वर**




महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या मुंबई प्रादेशिक विभागाचे आठवे द्वैवार्षिक अधिवेशन ७नोव्हेंबर २०२५ रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात उत्साही वातावरणात पार पडले. महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान फेस्कॉम चे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी भूषविले.

या कार्यक्रमात अभिनेते प्रशांत दामले यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रसंगी आईस्कान चे अध्यक्ष दिगंबर चापके, फेस्कॉमचे माजी अध्यक्ष अरुण रोडे, मुंबई विभाग फेस्कॉमचे अध्यक्ष सुरेश पोटे, कार्यकारणी सदस्य व महाराष्ट्रातील पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्व मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष सुरेश पोटे यांनी केले व कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आव्हान केले. जेष्ठ व्यक्तीं ने उर्वरित जीवनात शांत राहणे, ध्यान करणे, छंद जोपासणे, आनंदी राहणे असे मत लोकप्रिय अभिनेते प्रशांत दामले यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केले. उपस्थितांशी संवाद साधताना गणेश नाईक म्हणाले की आज ज्येष्ठांच्या बाबतीत हिंसाचाराच्या अनेक घटना घडत आहेत. मुलांनी ज्येष्ठ व्यक्तींना त्रास न देता त्यांचा सांभाळ करावा. आजची मुले उद्याचे ज्येष्ठ नागरिक आहेत. याचे भान त्यांनी ठेवावे. असं सांगून ते म्हणाले की, ज्येष्ठांच्या हिंसाचाराच्या विषयावरती उत्तम नाटक प्रशांत दामले यांनी घेऊन यावे. त्यांना जे काही सहकार्य लागेल ते आम्ही देऊ. नवी मुंबई हे ज्येष्ठ नागरिकांना राहण्यासाठी परिपूर्ण असे शहर आहे. नवी मुंबईत ज्येष्ठांसाठी अनेक विरंगुळा केंद्र आहेत. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेत ज्येष्ठांसाठी एक कक्ष आहे. असे अण्णासाहेब टेकाळे यांनी सांगितले.

माधवबागचे डॉक्टर मिलिंद सरदार यांनी ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या हृदयाची काळजी कशी घ्यावी याविषयी सखोल माहिती दिली. त्याचप्रमाणे अपोलो हॉस्पिटल, माधवबाग, पितांबरी व संजीवनी ब्लड ग्रुप ॲप यांनी आपला सहभाग दर्शवून ज्येष्ठांना उपयोगी अशी आरोग्य विषयक माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी देशपांडे यांनी खूप सुंदरपणे केले. अधिवेशन पार पडण्यासाठी शरद डिचोलकर, प्रतिभाताई सराफ, स्वातीताई फडके, लत्ताताई पोवार, श्रीराम शिवडेकर, दिलीप गाडेकर, दिलीप धारकर, बळवंत पाटील यांनी सहकार्य केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रेमंडची शताब्दी मानवंदना कृत्रिम बुद्धिमत्ते द्वारे चलचित्रपटात सादर




**मुंबई, सचिन मुरडेश्वर**

विश्वास, गुणवत्ता आणि उत्कृष्टतेची शंभरी गाठलेल्या देशातील नामांकित घरगुती ब्रॅण्ड रेमंडने नुकतेच शताब्दी वर्ष साजरे केले. या शताब्दी कार्यक्रमात रेमंडकडून भविष्यातील लक्षणीय उपक्रमांची माहिती सादर करण्यात आली. यावेळी जनरेटिव्ह आय तंत्रज्ञानाचा वापर करुन संगीत मानवंदना चित्रफित सादर करण्यात आली. अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम असून, साडेतीन मिनिटांच्या या चित्रफितीमध्ये एआय-जनरेटेड मॉडेल्स वास्तववादी मानवी व्यक्तिरेखांमध्ये जिवंत करण्यात आले आहे. तंत्रज्ञान आणि भावना यांचा सुरेख संगम साधणा-या या सिनेमॅटिक कथानकातून वारसा ब्रॅण्डसाठी कथाकथन कसे असू शकते, याची पुनर्कल्पना येते.

चित्रपटनिर्मितीमागील अथक प्रवास १६ ऑगस्ट २०२५ रोजी या महत्त्वकांक्षी प्रकल्पाला सुरुवात झाली. रेमंडने मार्केटिंग मोजिटो या कंपनीला आपल्या कंपनीची संकल्पना जिवंत, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे मानवंदना तयार करण्याचे काम सोपवले. स्क्रिप्टिंग आणि स्टोरी-बोर्डिंगपासून ते फ्रेम, पात्र आणि वातावरण तयार करण्यापर्यंत अगदी मुळापासून प्रत्येक पैलूची निर्मिती करण्यात आली. या टीमने सलग १५ दिवस रात्रंदिवस अथक परिश्रम घेतले. सर्व्हर क्रॅश, रेंडरिंग त्रुटी आणि सर्जनशील अडचणींवर मात करत त्यांनी रेमंडच्या शतकभराच्या नावीन्यपूर्ण भावनेचे प्रतीक असलेली ही सिनेमॅटिक कलाकृती वेळेत पूर्ण केली.

रेमंडची ही शताब्दी मानवंदना ब्रॅण्डच्या समृद्ध वारशाचा सन्मान करत सर्जनशीलता आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधत भविष्याकडे वाटचाल करते. ही शताब्दी मानवंदना भविष्याकडे टाकलेले धाडसी पाऊल आहे. ब्रॅण्ड आता नवीन युगातील कथा तयार करण्यासाठी एआयचा स्वीकार करताना कंपनीचे मूळ मनोगत जपतो. या मनोगतामध्ये ब्रॅण्डची उत्कृष्ट कारागिरी आणि मूल्ये जपण्यात आली आहेत. ही कामगिरीमुळे गेल्या शंभर वर्षांपासून कंपनी जनमानसात आदर बाळगून आहे. रोहित खन्ना, रेमंड कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स म्हणाले,''आम्हांला रेमंडसाठी केवळ श्रध्दांजली द्यायची नव्हती. या कार्यक्रमानिमित्ताने गेल्या शतकभराचा वारसा आणि भविष्याच्या वेगाने पुढे जाण्याची संकल्पना सर्वांसमोर सादर करायचा होता. आम्ही एआय तंत्रत्रानाचा वापर करुन वारसा आणि नावीन्य यांना एकाच भावस्पर्शी कथानकात एकत्र आणू शकलो. हे कथानक आमचा सखोल परिचय देते. एवढ्या मोठ्या प्रकल्पाला केवळ काही आठवड्यात पूर्ण करणे हे आमच्या टीमच्या कौशल्याचे, चपळतेचे प्रमाण आहे. मानवी सर्जनशीलता आणि बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने एकत्रित काम केल्यास घडणारी किमया या उपक्रमांतून दिसून आली.''

अरोरा यांच्या विधानाला मार्केटिंग मोजिटोचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल अरोरा यांनीही सहमती दर्शवली ते म्हणाले,''कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी सर्जनशीलतेची जागा घेत नाही परंतु कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने मानवी सर्जनशीलता अधिक प्रभावी दिसून येते. तंत्रज्ञान आणि मानवी भावभावना यांचा मिलाफ साधणे हे आमचे उद्दिष्ट आहे. रेमंडची मानवंदना त्याकरिता परिपूर्ण कॅन्व्हास ठरली. ब्रॅण्डचा वारसा, कालातील कथा सांगण्यासाठी नाविन्याचा वापर कसा करु शकतात, याचा नवीन मापदंड यातून निश्चित झाला आहे.''


**PUBLIC NOTICE**

NOTICE hereby given public at large that, ASHA KISHORE DOMADIA (Jt. Owner – having 50% share) was a Joint member of the GEET NEET SHANTINAGAR CO-OP. HSG. SOC. LTD., having, address at SECTOR NO.2, SHANTI NAGAR, MIRA ROAD (E), DIST. THANE 401 107 and holding SHOP NO.05 on the GROUND floor, BLDG NO.A-10 of the society died on 13/06/2020 and her husband Mr. KISHORE CHIMANLAL DOMADIA died on 28/02/2022, her son Mr. BHAVIN KISHORE DOMADIA died on 03/02/2024 & her Daughter-in-law NIDHI BHAVIN DOMADIA also died on 09/08/2021 her son Mr. TEJAS KISHORE DOMADIA (Existing Joint Owner – having 50% share) has applied for 100% membership of the society and sole ownership of the shop.

That as per Bye Laws of the society, hereby invites claims or objections for the transfer of the shares and interest of the deceased member within a period of 14 days from the publication of this notice, contact the undersigned or the society.

Place : Mira Road (East),
Dated:11/11/2025

**Mr. H.K. Someshwar**
**Advocate, High Court, Bombay**
**Mobile No.9819409260**

**जाहीर सूचना**

याद्वारे सुचना देण्यात येते की माझे क्लायंट श्री.जिगर एच.शाह आणि श्री. हसमुख एम .शाह सदर प्लॅट क्रमांक ३०३, तिसरा मजला ,सी विंग, गोकुल आर्केड (अगरवाल गार्डन्स) सीएचएस लिमिटेड ,गोकुल टाऊनशिप, बोळिंज ,विरार (पश्चिम),ता .वसई , जिल्हा-पालघर -४०१३०३ ,सोसायटी नोंदणी क्रमांक टीएनए /(व्हीएसआय)/ एचएसजी/ (टीसी)/ २१८७३/१०-११,दिनांक-०१/०६/२०१० चे मालक. परंतु या फ्लॅटच्या आणखी एका मालकीण श्रीमती मीना एच .शाह, वय -६९ वर्षे, दिनांक -१८/०९/२०२५ रोजी निधन पावले ,ते त्यांच्या पाच कायदेशीर वारसांच्या मागे राहत होते १. श्री . हसमुख एम .शाह (पति), २.श्री. सुमित एच.शाह ,(मुलगा ). ३.जिगर एच शाह (मुलगा), ४ . मेघा भाविन शाह (सून), ५. खुशी भाविन शाह (नात) इतर कोणीही नाही. म्हणून आम्ही याद्वारे दावा किंवा आक्षेप मागवतो कि सदर खोलीच्या संदर्भात कोणत्याही व्यक्तीला कोणताही दावा किंवा आक्षेप असल्यास त्यांनी प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत आमच्या वकिल कार्यालयाला लेखी स्वरुपात कळवावे.

**सही/-**
**ओमप्रकाश पाण्डेय**
**(वकील - हायकोर्ट)**
शॉप नं.०५, स्टार सफायर सी.एच.एस.लि.
वाय.के.नगर ॲनेक्स, विरार (प.)
पालघर - ४०१ ३०३


# "माझ्या ३५ वर्षांच्या राजकारणात कोणताही आरोप सिद्ध झालेला नाही" : पुणे जमीन व्यवहार प्रकरणावर अजित पवारांचे स्पष्टीकरण

**मुंबई : सचिन मुरडेश्वर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी पुण्यात त्यांच्या पुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीशी संबंधित वादग्रस्त जमीन व्यवहाराबाबत बोलताना हा व्यवहार "पूर्णपणे समजण्यापलीकडचा" असल्याचे सांगितले आणि "असा व्यवहार होऊच नये होता" असे स्पष्ट केले. त्यांनी पुढे सांगितले की राज्य सरकारने या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

पुण्यातील मुंढवा महार वतन जमीन, ज्याची बाजारभावानुसार किंमत सुमारे १,८०० कोटी रुपये आहे, ती अमाडेया एन्टरप्रायझेस एलएलपी या कंपनीने विकत घेतल्याचे सांगितले जाते. या कंपनीत अजित पवार यांचा पुत्र पार्थ पवार यांचा ९९ टक्के हिस्सा असल्याचे समोर आले आहे. ही जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत घेतल्याचा आणि आयटी पार्क उभारणीच्या कारणावरून फक्त ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरून सवलत मिळवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. पवार यांनी



सांगितले की या विक्रीची मुळे २००६ मध्ये झालेल्या एका बेकायदेशीर व्यवहारात आहेत. त्या वेळी शीटल तेजवानी नावाच्या एका महिलेने, २७२ वतनदारांच्या (स्वातंत्र्यपूर्व जमीनदारांच्या वंशजांच्या) वतीने पावर ऑफ अटर्नी घेतली होती आणि तिने ती जमीन बेकायदेशीरपणे विकली होती.

शनिवारी पक्षाच्या बैठकीनंतर 'एनएच'शी बोलताना पवार म्हणाले,

"या व्यवहारात एक रुपयाही देवाणघेवाण झालेली नाही. विक्रेत्याला कोणतेही पैसे दिलेले नाहीत आणि जमिनीचा ताबाही घेतलेला नाही."

तथापि, त्यांनी हे मान्य केले की "खरेदी करारावर स्वाक्षरी होऊच नये होती" आणि नोंदणी प्रक्रिया कशी झाली, याबाबत शंका उपस्थित केली. त्यांनी आपल्या कुटुंबाविरुद्ध होणाऱ्या "अनावश्यक बदनामी"ला पूर्णविराम देण्याची मागणी केली.

पवार म्हणाले की, हा मुद्दा त्यांच्या लक्षात येताच त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कोणाच्याही प्रभावाखाली न येता सखोल आणि पारदर्शक चौकशी करण्याचे आदेश दिले. "माझ्या लक्षात येताच मी तात्काळ आदेश दिले की कोण सहभागी आहे याची पर्वा न करता योग्य आणि निष्पक्ष चौकशी व्हायलाच हवी," असे ते म्हणाले.

३५ वर्षांहून अधिक काळ सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या अजित पवार यांनी सांगितले की, त्यांच्या राजकीय कारकिर्दीत अनेक आधारहीन आरोप करण्यात आले, जे प्रामुख्याने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुढे येतात.

"माझ्या ३५ वर्षांच्या राजकारणात अनेक आरोप झाले, परंतु एकही सिद्ध झालेला नाही. मात्र, बदनामी मात्र खूप झाली. असे आरोप साधारणतः निवडणुकीपूर्वीच येतात आणि निवडणुका संपल्यानंतर नाहीसे होतात," असे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले की राज्य सरकार या प्रकरणाकडे अत्यंत गंभीरतेने पाहत आहे. "मुख्यमंत्र्यांनी नियमानुसार सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात तिघांविरुद्ध — ज्यात एका तहसीलदाराचाही समावेश आहे — एफआयआर दाखल झाला आहे. पोलिस तपास सुरू झाला आहे आणि छापेही टाकण्यात आले आहेत," असे त्यांनी सांगितले.

पवार यांनी स्पष्ट केले की या व्यवहाराबाबत त्यांना "अजिबात माहिती नव्हती", आणि जर ही बाब त्यांच्या लक्षात आधी आली असती, तर त्यांनी तो व्यवहार सरळ नाकारला असता.

"कोणत्याही व्यवहाराआधी कायदेशीर आणि तांत्रिक सल्ला घेतला जातो. मला या व्यवहाराबद्दल काहीच माहिती नव्हती. माहिती असती, तर मी तो नक्कीच थांबवला असता," असे त्यांनी 'एनएच'ला सांगितले.

त्यांनी कोणताही राजकीय दबाव नसल्याचे स्पष्ट केले आणि चालू असलेल्या चौकशीची माहिती दिली.

"माझ्यावर कोणताही राजकीय दबाव नाही. भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट सांगितले आहे की, या व्यवहारात सहभागी असलेल्या आणि नोंदणी कार्यालयात स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली असून तिला एका महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.


**VJTF EDUSERVICES LIMITED**
**CIN No. L80301MH1984PLC033922**
**Reg. Office:** Witty Neelkanth Apartment, Opp Mumbai Bank, Ramchandra Lane, Malad West, Mumbai - 400064
**Tel:** 022-46160493 **Email id:** - vjtfho@vjtf.com **Website:** - www.vjtf.com

**NOTICE OF THE BOARD MEETING**

NOTICE is hereby given, pursuant to Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, that a meeting of the Board of Directors of VJTF Eduservices Limited will be held at Witty Neelkanth Apartment, Ramchandra Lane, Opp. Mumbai Bank, Malad West, Mumbai - 400064, on Friday, 14th November, 2025 at 02.00 P.M. inter alia, to consider and approve the following:

1. To consider and take on record the Unaudited Financial Results of the Company for the Quarter and Half Year Ended on 30th September, 2025.
2. Any other business with the permission of the Chair.

The notice of this meeting is also available on the website of the Company https://vjtf.com and website of the stock exchange i.e. BSE Limited www.bseindia.com

**For VJTF Eduservices Limited**
**Sd/-**
**Vinay Dharamchand Jain**
**Managing Director**
**DIN – 00235276**

**Place: Mumbai**
**Date:01/11/2025**